




# पारनेर दर्शन

वर्ष ३ अंक ८७, मंगळवार २५ फेब्रुवारी २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये







## अतिक्रमणासंदर्भात संसदेत आवाज उठविणार

### ■ खा. नीलेश लंके यांची माहीती ■ न्यायालयीन लढाई देखील लढणार

अहिल्यानगर : प्रतिनिधी

**सर्व पुरावे असतानाही बुऱ्हानगर येथे भगत परिवाराचे मंगल कार्यालय तसेच वडगांव गुप्ता येथील गरीब मागासवर्गीय बांधवांच्या घरावर बेकायदेशीर ररित्या बुलडोझर फिरवून अन्याय केल्यासंदर्भात आपण संसदेत आवाज उठविणार असल्याचे खासदार नीलेश लंके यांनी सांगितले.**

बुऱ्हानगर येथील भगत यांच्या मंगल कार्यालयाचे बांधकाम पाडण्यात आल्यानंतर वडगांव गुप्ता येथेही प्रशासनाच्या वतीने अतिक्रमण असल्याचे सांगत घरे जमीनदोस्त करण्यात आली. खा. नीलेश लंके यांनी उघडयावर पडलेल्या कुटूंबांची भेट घेत आपण त्यांच्या पाठशी उभे आहोत. संसदेत आवाज उठवू. थेट सर्वोच्च न्यायालयात हा विषय मांडता येईल का यासंदर्भात वकीलांशी सल्लामसलत करतो अशी ग्वाही खा. लंके यांनी दिली.

यावेळी नागरिकांशी संवाद साधताना खा लंके म्हणाले, तुमची घरे पाडल्यानंतर तुमच्यापेक्षाही अधिक दुःख आम्हाला झाले आहे. गरीबी काय असते हे मला माहीती आहे, आम्ही ते भोगलेले आहे.

खा. लंके पुढे म्हणाले, आज आपल्यावर वाईट काळ आला आहे. परंतू ज्यांच्यामुळे आपल्यावर ही वेळ आली आहे, त्यातून त्यांना सुख मिळणार नाही. त्यांनाही एक दिवस याच चरखामधून जावे लागणार आहे. या संकटातून आपण पुढे जाऊ. तुम्ही काळजी करू नका, मी तुमच्या सोबत आहे. मी तुमच्या कुटूंबातील आहे. तुमची दुःख मी देखील भोगलेले आहे. मी काही मोठया घरातून आलेलो नाही.



■ वडगांव गुप्ता येथील मागासवर्गीय कुटूंबांची घरे जमीनदोस्त करण्यात आल्यानंतर खा. नीलेश लंके यांनी या कुटूंबांची भेट घेत आपण तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली.

#### स्वार्थासाठी हिंदुत्वाच्या गप्पा !

बुऱ्हानगर येथील पालखीला ११०० वर्षांची परंपरा आहे. ती पालखीही त्यांनी बुडोझरखाली गाडली. आणि ते हिंदुत्वाच्या गप्पा मारत आहेत. तेथील देवीची कमान पाडण्यात आली. वडगांव गुप्तामध्ये मंदिर उध्वस्त करण्यात आले. केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी हे हिंदुत्वाच्या गप्पा मारत आहेत असा आरोप खा. लंके यांनी केला.

#### एक दिवस कायदा आपल्या बाजूने उभा राहील

या अन्यायाविरोधात आपण कायदेशीर लढाई करू. एक ना एक दिवस कायदा आपल्या बाजूने उभा राहणार आहे. कायद्याची चौकट सोडून कोणी काही करू शकत नाही. ही कायदेशीर लढाई आपण जिंकणार आहोत. ज्या अधिकाऱ्यांनी चुकीची कारवाई केली त्या अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यासाठी आपण पुढाकार घेणार असल्याचे खा. लंके म्हणाले.

#### उत्तर प्रदेशातही अशी कारवाई

उत्तरप्रदेशात अशा पध्दतीने अन्याय करण्यात आला होता. न्यायालयाने संबंधितांना नुकसानभरपाई देखील देण्याचे आदेश दिले होते. दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली होती. शरद पवार यांच्या माध्यमातून मी संबंधितांची भेट घेणार असून त्यासाठी तुम्ही तुमच्याकडील पुरावे माइ-याकडे द्या.

#### मलाही तुरूंगात डांबण्याचा कट

घरे जमीनदोस्त होताना मला पाहवले नसते. त्यामुळे मी इकडे आलो नाही. मी दवाखान्यात दाखल होतो तरीही आलो असतो. त्यांना हे अपेक्षीत आहे की मी कुठेतरी आलो पाहिजे, माझ्यावर गुन्हे दाखल करून माझ्यासारख्यालाही तुरूंगात डांबण्याची त्यांची तयारी आहे. हा सर्व कट आहे असा गंभीर आरोप खा. लंके यांनी केला.

#### बॅकवर्ड क्लास सोसायटीची जमीन

वडगांव गुप्ता येथील गट नंबर ५९१/१ या क्षेत्रात ४० ते ५० मागासवर्गीय कुटूंब ३० ते ३५ वर्षापासून राहत आहेत. तत्कालीन प्रांताधिकाऱ्यांनी ३ डिसेंबर १९६४ मध्ये बॅकवर्ड क्लास फामग सोसायटीसाठी या गटातील उत्तर बाजूचे ६१३ एकर २८ गुंठे इतके क्षेत्र दिलेले आहे. या कुटूंबांकडे आधार कार्ड, मतदार यादीत नाव, ग्रामपंचायतचे नळ कनेक्शन, वीजेचे मिटर या गोष्टीही असल्याचे तेथील नागरीकांचे म्हणणे आहे.

#### आमच्यासारख्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी गरीबांच्या घरांवर बुलडोझर

हा विषय मी संसदेमध्ये मांडणार आहे. थेट सुप्रिम कोर्टात हा विषय मांडता येईल का याविषयी वकीलांशी चर्चा करू. म्हातारी मेल्याचे दुःख नाही तर काळ सोकावता कामा नये. आमच्या सारख्या लोकांना सुरक्षित ठेवण्यासाठी गरीबांच्या घरांवर बुलडोझर फिरविण्यात आल्याचे लंके म्हणाले.

#### दबाव म्हणून तुम्ही घरांवर नांगर फिरवणार का?

अधिकारी दबावामुळे कारवाई केल्याचे सांगत असले तरी अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकारात ही कारवाई केली आहे. तुमच्यावर दबाव आहे म्हणून तुम्ही लोकांच्या घरावर नांगर फिरवणार का ? तुम्ही चुकीचे केले तुम्हाला फेडावे लागणार आहे. ज्यांनी करायला लावले त्यांनाही फेडावे लागणार आहे. आज माझे गोरगरीब लोक उघडयावर आहेत. त्यासाठी कायदेशीर लढाईच करावी लागणार असल्याचे खा. लंके यांनी ठामपणे सांगितले.

## कुकडीचे आवर्तन सुटले, पिंपळगांवचे का नाही?

### लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांचा संतप्त सवाल



अळकुटी : प्रतिनिधी

**कुकडी डाव्या कालव्यातून नियोजनापेक्षा चार दिवस अगोदर म्हणजे १५ फेब्रुवारी रोजी आतर्वन सोडण्यात आले. पिंपळगांव जोगा कालव्याचे मात्र आजूनही आवर्तन न सुटल्याने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. कुकडी कालव्याच्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांची पिके जळतात मग आमची पिके जळणार नाहीत का असा सवाल शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे.**

पिंपळगांव जोगा कालव्याचे आवर्तन कधी सुटणार अशी विचारणा संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्यात आली असता वरून आदेश आला नसल्याचे अधिकारी सांगतात. मागील रोटेशनच्या वेळी कुकडी कालव्याचे पाणी पिंपळगावच्या आवर्तनानंतर बंद झाले. आताही शेतकऱ्यांच्या मागणीनुसार चार दिवस अगोदर आवर्तन सोडण्यात आले. कुकडी कालव्याच्या लाभक्षेत्रातील पिके जळतात मग पिंपळगांव जोगा कालव्याच्या लाभक्षेत्रातील पिके जळत नाहीत का ? हा कोणता न्याय असा सवाल करण्यात आला आहे.

#### गेज जमीनीत दाबण्याचे उद्योग

पारनेर तालुक्याचे मागील आवर्तन बंद झाल्यानंतर पुणे जिल्ह्यात मात्र अनेक दिवस पाणी सुरू होते. कालव्याच्या टेलला पाणी पोहचण्या अगोदरच पुणे जिल्ह्यात पाणी घेतले जाते. पाण्याचा गेज मिळत नसताना गेज जमीनीमध्ये दाबून ठेवण्याचे उद्योग जलसंपदा विभागाचे कर्मचारी करून गेज मिळत असल्याचा देखावा करत असल्याच्या बाबी उघड झाल्या आहेत. त्याची कोणी वाच्यता केली नाही. पारनेर तालुक्यावर किती अन्याय करणार असा सवाल करण्यात येत आहे.

#### शेतकऱ्यांची पिके धोक्यात

पिंपळगांव जोगा कालव्याचे आवर्तन कधी सुटणार याची विचारणा केली असता अधिकारी उडवा उडवीची उत्तरे देतात. आवर्तन सुटेल या भरवशावर अनेक शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील नगदी पिके घेतली आहेत. रोपे, खते, मशागत असा मोठा खर्च करण्यात आला आहे. वेळेवर आवर्तन सुटले नाही तर ही पिके जळून जाण्याचा धोका आहे. शेतकरी अडचणीत येईल. अगोदरच बाजार भावाची अडचण आणि पाण्याची ही स्थिती आहे. पाणी येणार नाही असे जाहिर करण्यात आले असते तर शेतकऱ्यांनी रब्बीच्या पिकांसाठी खर्च केला नसता असेही शेतकरी सांगतात.

#### पुणे जिल्ह्यात अलबेल, पारनेकरांचा टाहो


आळेफाटाच्या मागील गावांनी काही दिवसांपूर्वी पाणी बंद करण्यासाठी उपोषणाचा इशारा दिल्यानंतर पाणी बंद करण्यात आले. अतिरिक्त पाण्यामुळे शेतकऱ्यांचे कांदा पिक खराब होऊ लागले होते. याच मागणीसाठी डिंगोरीच्या ग्रामस्थांनी मोर्चा काढला होता. पुणे जिल्ह्यात अतिरिक्त पाणी तर पारनेर तालुक्यात पाण्यासाठी टाहो फोडण्याची वेळ येते असा हा विरोधाभास आहे.

## अपघातानंतर मोटर पेटून दोघांचा जळून मृत्यू

### मृतांमध्ये पोलीस कर्मचाऱ्यासह तरुणाचा समावेश

जामखेड : प्रतिनिधी

**शहरातील बीड रस्त्यावर चारचाकी मोटार रस्त्याच्या दुभाजकाला धडकल्यानंतर, मोटारीने पेट घेतला. या अपघातात जामखेड पोलिस ठाण्यातील कर्मचार्यासह आणखी एका तरूणाचा जळुन मुत्यू झाला. हा अपघात आज, सोमवारी पहाटे घडला.**



धनंजय नरेश गुडवाल, (३५) व महादेव दत्ताराम काळे, (२८ वर्षे, रा. आदित्य मंगल कार्यालय शेजारी, बीड रस्ता जामखेड) अशी दोघा मृतांची नावे असल्याची माहिती जामखेड पोलिस ठाण्याचे निरीक्षक महेश पाटील यांनी दिली. महादेव काळे व पोलीस कर्मचारी धनंजय गुडवाल हे दोघे आज पहाटे ४ च्या सुमारास मोटारीतून (एमएच १६ डीएम ३८५३) जामखेड शहराकडे येत होते. मोटार एका हॉटेलसमोरील दुभाजकाला धडकली व मोटारीने पेट घेतला. अत्याधुनिक उर्वरीत पान ३ वर

## ...तर राज-उद्धव भेटीचे स्वागत !

### साहित्य संमेलनातील वक्तव्यावरुन फडणवीसांचे खडे बोल सकाळच्या भोंग्याला सुसंवाद शिकवण्याचा टोला

मुंबई : प्रतिनिधी

**दिल्ली येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून काही राजकीय वक्तव्ये देखील समोर आली आहेत. या सर्व व्यक्तव्या विषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खडे बोल सुनावले आहेत. साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर बोलताना प्रत्येकाने मर्यादा ठेवायला हव्यात, असा सल्ला फडणवीस यांनी दिला आहे.**

इतकेच नाही तर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात सुरू झालेल्या सुसंवादाचे देखील त्यांनी स्वागत केले. मात्र ते करत असतानाच सकाळच्या भोंग्याला देखील माध्यमांनी सुसंवाद शिकवायला हवा, असा टोला त्यांनी संजय राऊत यांना लगावला आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एका कार्यक्रमात एकत्र आले होते त्यांच्यामध्ये सुसंवाद झाला. राज्यात कोणीही कोणाशी सुसंवाद साधत असेल तर त्याचे स्वागतच आहे. राज्यात कोणीही विसंवाद करू नये. सुसंवाद असायलाच हवा, यात कोणाचेही दुमत असायचे कारण नाही. तसेच आपणही सर्वांनी मिळून सकाळी नऊ वाजेच्या भोंग्याला देखील सुसंवाद कसा करायचा हे शिकवले तर राज्यातील संवादाची परिस्थिती चांगली होईल, असा टोला त्यांनी संजय राऊत यांना लगावला आहे. ज्याप्रमाणे ५० टक्के दोषी हे सकाळचा भोंगा वाजवणारे आहेत त्याचप्रमाणे माध्यमे देखील त्याला



५० टक्के दोषी असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

चौकशीचा अर्थ अनियमितता नाही

आमच्याकडे कोणीही तक्रार केली तरी त्या तक्रारीची आम्ही चौकशी करत असतो. त्यामुळे कृषी विभागाबाबत आलेल्या तक्रारीच्या प्रकारची चौकशी आम्ही करत आहोत. मात्र तक्रार झाली म्हणजे अनियमितता झाली असे म्हणण्याचे काही कारण नाही. तक्रारीच्या चौकशीतून जे काही समोर येईल त्यानंतरच याबद्दल अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. कृषी विभागात अनेक प्रकारे गैरव्यवहार झाले असल्याचा आरोप होत आहे. यासाठी माजी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांना जबाबदार धरले जात आहे. या प्रकरणावर देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

साहित्य संमेलनाच्या मर्यादा पाळाव्यात

प्रत्येकाने साहित्य संमेलनात बोलताना त्या ठिकाणी काही मर्यादा ठेवायला हव्यात. विशेषतः जे साहित्यिक आहेत, त्या साहित्यिकांनी देखील वारंवार असे वाटते की, राजकारण्यांनी आमच्या व्यासपीठावर उर्वरीत पान ३ वर

## केंद्र व राज्यातील सरकारमुळे निधी कमी पडणार नाही

### । आ. काशिनाथ दाते यांचा विश्वास । रेनवडी येथे आ.दाते आ. सोनवणे यांचा सत्कार



रेनवडी : प्रतिनिधी

**राज्यात व केंद्रात एकाच विचारांचे सरकार असल्याने विविध विकास कामांसाठी निधीची कमतरता भासणार नाही असा विश्वास व्यक्त करतानाच रेनवडी व परिसराच्या विकासासाठी हवा तेवढा निधी देण्याची ग्वाही आमदार काशिनाथ दाते यांनी दिली.**


मा. उपसरपंच बाबासाहेब येवले यांच्या पुढाकारातून आ. काशिनाथ दाते व जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांचा रेनवडी ग्रामस्थांच्या वतीने सत्कार तसेच पेढेतुला करण्यात आली, त्यावेळी आ. दाते हे बोलत होते. भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बोलताना दाते म्हणाले, रेनवडी बंधारा रस्ता, जांभळी मळा रस्ता, हनुमान मंदीर सभामंडप ही कामे या आर्थिक वर्षात मार्गी लावण्यात येतील. महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी मनापासून काम केल्याने विधानसभा निवडणूकीमध्ये रेनवडी या सर्वात कमी मतदानाच्या गावाने २३६ मतांची आघाडी दिल्याबद्दल दाते यांनी कृतज्ञता व्यक्त केली. रेनवडीमधील विकास कामे पुर्ण करून गावाचा चेहरा मोहरा बदलू अशी ग्वाही दाते यांनी यावेळी दिली.

यावेळी जिल्हा पातळीवरील उंच उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल समृध्दी राजाराम येवले हिचा तर प्रथमेश पवार याने तालुका उर्वरीत पान ३ वर

#### महायुतीमुळे विजय

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या सार्वत्रीक निवडणूकीत महायुतीच्या सर्व पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांनी मनापासून साथ देत परीश्रम घेतले त्यामुळेच माझा या निवडणूकीत विजय झाल्याचे आ. दाते यांनी यावेळी कृतज्ञतापुर्वक सांगितले.

# प्रगतीमंत्र



# CISF कॉन्स्टेबल ड्रायव्हरची 1100+ पदांसाठी भरती

**CISF मध्ये दहावी उत्तीर्णांसाठी कॉन्स्टेबल ड्रायव्हरची मोठी भरती सुरू झाली आहे. या भरतीची अधिकृत जाहिरात आधीच प्रसिद्ध करण्यात आली होती, तर केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या अधिकृत वेबसाइट cisfrectt.cisf.gov.in वर ३ फेब्रुवारीपासून ऑनलाइन फॉर्म भरण्याची प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवार अर्ज करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत म्हणजेच ४ मार्चपर्यंत फॉर्म भरण्याची प्रक्रिया पूर्ण करू शकतात. शेवटच्या तारखेनंतर अर्जाची लिंक उघडणार नाही.**

## सीआयएसएफ कॉन्स्टेबल ड्रायव्हर पात्रता

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF) ची ही भरती कॉन्स्टेबल ड्रायव्हरच्या ८४५ पदांसाठी आणि कॉन्स्टेबल ड्रायव्हर पंप ऑपरेटरच्या २७९ पदांसाठी आहे. या भरतीद्वारे एकूण ११२४ पदे भरली जातील. या भरतीमध्ये अर्ज करण्यासाठी, उमेदवारांनी मान्यताप्राप्त दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. याशिवाय, जड मोटार वाहन किंवा वाहतूक वाहन/हलके मोटार वाहन/मोटारसायकल गियर, तीन वर्षांचा एचएमव्ही ड्रायव्हिंग अनुभव, वाहतूक वाहन, एमएमव्ही/मोटारसायकल गियर परवाना असणे देखील आवश्यक आहे. ही भरती फक्त पुरुष उमेदवारांसाठी आहे. उमेदवार भरती अधिसूचनेमधून CISF ड्रायव्हर पात्रता संबंधित माहिती देखील तपशीलवार तपासू शकतात.

## CISF ड्रायव्हरचा पगार किती असेल?

- वयोमर्यादा : CISF मध्ये कॉन्स्टेबल होण्यासाठी उमेदवारांचे किमान वय २१ वर्षे आणि कमाल वय २७ वर्षे आहे. उमेदवारांचे वय ४ मार्च २०२५ च्या आधारे मोजले जाईल. तथापि, राखीव प्रवर्गांना उच्च वयोमर्यादेत सूट दिली जाईल.
- उंची : CISF कॉन्स्टेबलसाठी, पुरुष उमेदवारांची उंची १६७ सेंमी आणि छाती ८०-८५ सेंमी असावी.
- पगार : उमेदवारांना दरमहा २१,७००-६९,१०० रुपये वेतन दिले जाईल.

## अर्ज कसा करावा?

- सर्वप्रथम CISF ची अधिकृत वेबसाइट cisfrectt.cisf.gov.in ला भेट द्या.
- जर तुम्ही पहिल्यांदाच CISF भरती फॉर्म भरत असाल तर नवीन नोंदणी लिंकवर जा. जर तुम्ही आधीच कोणत्याही CISF रिक्त पदासाठी अर्ज केला असेल, तर साइटवर लॉग इन करा.
- नोंदणी आणि मोबाईल नंबर, ईमेल पडताळणीची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, नोंदणी क्रमांकाद्वारे पुन्हा वेबसाइटवर लॉगिन करा.
- अर्ज उघडल्यानंतर, शैक्षणिक पात्रता आणि वैयक्तिक माहितीशी संबंधित सर्व आवश्यक तपशील काळजीपूर्वक भरा.
- अपलोड डॉक्युमेंट्स विभागात, तुमची दहावीची गुणपत्रिका, फोटो आणि स्वाक्षरी योग्य आकारात अपलोड करा.
- अर्ज शुल्क भरा आणि फॉर्मची अंतिम प्रिंट काढा.
- अर्ज करताना, सामान्य/ईडब्ल्यूएस/ओबीसी उमेदवारांना १०० रुपये अर्ज शुल्क भरावे लागेल. एससी, एसटी, ईएसएम उमेदवारांसाठी कोणतेही शुल्क नाही. या भरतीशी संबंधित इतर कोणत्याही माहितीसाठी, उमेदवार CISF च्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊ शकतात.

# सोहळा करूया सर्वांग सुंदर..!



**इव्हेंट मॅनेजमेंट ही संज्ञा गेल्या काही वर्षांत आपल्या सर्वांच्याच परिचयाची झाली आहे. कॉर्पोरेट जगतात नोकरभरतीपासून निरोप समारंभापर्यंत; जनसामान्यांच्या आयुष्यातील अगदी बारशापासून थेट पंचाहत्तरीपर्यंत; मनोरंजन उद्योग, प्रोमो पार्टीज, संगीताची मैफल, फॅशन परेड; तर राजकारणी मंडळींच्या प्रचार मोहिमा, प्रचार सभा; क्रीडा क्षेत्रात, शाळा- महाविद्यालयांमधील सांघिक क्रीडा स्पर्धांपासून ते थेट मुंबई, मॅरेथॉनसारख्या राष्ट्रीय स्तरावरील सोहळ्यांचे व्यवस्थापन आज इव्हेंट मॅनेजमेंट संस्थांद्वारे करण्यात येते. एखादा दिमाखदार सोहळा किंवा नियोजनबद्ध सभा घडवून आणण्याचे सारे श्रेय या व्यक्तींचे असते. या करिअर क्षेत्रातील व्यक्तींना पडद्यामागचे कलाकार म्हटलेले अधिक उचित ठरेल...**

इव्हेंट मॅनेजमेंट कार्यक्षेत्राचा आवाका खूप मोठा आहे आणि वाढती बहुस्तरीय लोकसंख्या, गेल्या दोन- तीन दशकांत बोकाळलेला चंगळवाद, भारतीयांची उत्सवप्रियता, समारंभाच्या आयोजनासाठी प्रत्येकाला भेडसावणारी वेळेची कमतरता आणि वाढलेली क्रयशक्ती हे सर्व लक्षात घेता इव्हेंट मॅनेजमेंट कार्यक्षेत्रातील नोकरीच्या, स्वयंउद्योगाच्या भरपूर संधींची शक्यता अगदी स्पष्ट दिसून येते.



## कामाचे टप्पे

- संकल्पना चित्र तयार करणे (कन्सेप्ट व्हिज्युअलायझेशन) : प्रस्तावित इव्हेंट किंवा समारंभ प्रत्यक्ष कसा असेल किंवा दिसेल याचे कल्पनाचित्र स्पष्ट होणे.
- समारंभाचे नियोजन करणे : कार्यक्रमाच्या आयोजनासाठी, आवश्यक कामांच्या पूर्ततेसाठी आराखडा तयार करणे.
- समारंभाचे आर्थिक अंदाजपत्रक तयार करणे : संपूर्ण कार्यक्रमाच्या आवश्यक त्या प्रमाणकानुसार यशस्वी सादरीकरणासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता भासेल आणि त्यासाठी किती खर्च येईल याचे अचूक अंदाजपत्रक करणे गरजेचे ठरते.
- समारंभाचे आयोजन : कार्यक्रमाच्या प्रत्यक्ष उभारणीसाठी, आवश्यक त्या गोष्टींचा घटनाक्रम आखणे.
- कामांचा समन्वय साधणे : अंतिम कार्यक्रम उभारणीच्या कामांतर्गत येणारी लहान कामे विभागून ती वेगवेगळ्या व्यक्तींवर सोपवणे आणि कामात सुसूत्रता आणणे.
- समारंभाची प्रत्यक्ष अंमलबजावणी : प्रत्यक्ष कार्यक्रम आखणी आणि त्याची सुरक्षित अंमलबजावणी करणे.

## शैक्षणिक अर्हता

इव्हेंट मॅनेजमेंट क्षेत्रातील पदविका अभ्यासक्रमांसाठी कोणत्याही विद्याशाखेतील बारावीपर्यंतचे शिक्षण आवश्यक असते, तर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कोणत्याही शाखेतील पदवी प्राप्त असणे आवश्यक असते. जनसंपर्क व्यवस्थापन विषयातील पदवी आणि विपणन विषयातील पदव्युत्तर शिक्षण अशी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना इव्हेंट मॅनेजर म्हणून नोकरीची संधी मिळू शकते. देशातील अनेक संस्था या विषयातील पदवी-पदविका अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देतात. मात्र, इव्हेंट मॅनेजमेंट कंपन्या, उमेदवार नेमणुकीच्या वेळेस वेगवेगळ्या विद्याशाखेतून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना प्राधान्य देताना दिसतात. उदा. पर्यटन, व्यवस्थापन, विपणन, आदरातिथ्य वगैरे. म्हणजेच या करिअर क्षेत्राची आवड असेल तर अन्य विद्याशाखेतील पदवी प्राप्त केलेले विद्यार्थीही या क्षेत्रात प्रवेश करू शकतात.

## नोकरीची क्षेत्रे

चित्रपट किंवा मालिका प्रॉडक्शन हाऊसेस, फॅशन उद्योग, हॉटेल, आदरातिथ्य संबंधित क्षेत्र, जाहिरात क्षेत्र, इव्हेंट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी या क्षेत्रांत जनसंपर्क अधिकारी, कार्यक्रम अधिकारी, कार्यक्रम समन्वयक, पार्टी अँकर, तांत्रिक विकसन अधिकारी, क्रिएटिव्ह डिझायनर, सूत्रसंचालक, व्हॉइस आर्टिस्ट अशा विविध जबाबदाऱ्या आणि पदे सांभाळण्याची संधी मिळू शकते.

### आघाडीच्या शिक्षण संस्था

- इव्हेंट मॅनेजमेंट डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट, आय.ई.एस. मॅनेजमेंट कॉलेज, मुंबई. www.emdiworld.com
- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इव्हेंट मॅनेजमेंट, मुंबई. www.niemindia.com
- इंटरनॅशनल सेंटर फॉर इव्हेंट मार्केटिंग, नवी दिल्ली www.eventmanagementindia.com

## आवश्यक कौशल्ये...

- जनसंपर्क : या क्षेत्रात जम बसवायचा तर विविध वयोगटांच्या, वेगवेगळ्या कार्यक्षेत्रांतील, समाजाच्या विविध स्तरांतील व्यक्तींशी संपर्क प्रस्थापित करणे हिताचे ठरते. याचे कारण या पेशात वेगवेगळ्या व्यक्तींची मदत भासू शकते.
- कल्पनाशक्ती : एखादा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडणे हा या इव्हेंट मॅनेजमेन्टचा प्रमुख उद्देश असल्याने, नाविन्यपूर्ण आणि सर्जनशील कल्पना शोधून त्या प्रत्यक्षात उतरवण्यासाठी उत्तम कल्पनाशक्ती आवश्यक ठरते.
- विपणन कौशल्य : स्वत:च्या कल्पना, ग्राहकांच्या गळी उतरवून त्यांच्याकरवी कामाची संधी मिळवणे आणि केलेल्या कामाचे मोल ग्राहकापाशी सिद्ध करणे याकरता विपणन कौशल्य आवश्यक असते.
- व्यवस्थापन कौशल्य : एकाच वेळी अनेक गोष्टी हाताळणे तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या व्यक्तींकडून, ग्राहकांच्या अपेक्षांप्रमाणे काम करून घेणे याकरिता व्यवस्थापकीय कौशल्यांची गरज भासते.
- निर्णयक्षमता : कार्यक्रमाच्या आयोजनात जर आयत्या वेळी काही नकारात्मक परिस्थिती निर्माण झाली, तर लवकरात लवकर प्रभावी निर्णय घेऊन काम तडीस नेणे महत्त्वाचे ठरते.
- अद्ययावत माहिती हवी : या क्षेत्रात टिकून राहायचे असल्यास विविध क्षेत्रांमधील घडामोडी, अद्ययावत बदल यांची माहिती करून घेणे आवश्यक ठरते. उदा. अद्ययावत तंत्रज्ञान, नवीन फॅशन, नवीन पद्धती वगैरे. आयोजनात सतत नावीन्यपूर्ण बदल हेही गरजेचे ठरतात.



## व्यक्तिगत तयारी...

- वेळेवर कामे पूर्ण करण्यासाठी अथवा समारंभाच्या आयोजनादरम्यान अष्टौप्रहर काम करण्याची मानसिक व शारीरिक तयारी असावी.
- कामाच्या डेडलाइन्स सांभाळाव्या लागतात. सांघिकरीत्या काम करावे लागते. समाजाच्या विविध स्तरांत मिसळून काम करण्याची तयारी हवी. अनेकदा विविध कार्यक्षेत्रांतील सन्मान्य व्यक्तींना जवळून पाहता येते, भेटता येते, त्यांच्याशी तसेच कामासंबंधात इतरांशी संवाद साधण्याकरता एटिकेट, मॅनरिझम, संवाद साधण्याचे कसब अंगी बाणवायला हवे.
- एखादा मोठा समारंभ, कार्यक्रम आपण समर्थपणे आयोजित केला, ही बाब आत्मविश्वास वृद्धिंगत करणारी असते. मात्र, ते सांघिक यश असते, हे विसरता कामा नये.

# लग्न द्यावं करून...

**घरातला मुलगा किंवा मुलगी लग्नाच्या वयाची झाले की एका मोठ्या इव्हेंटची तयारी सुरू होते. नावनोंदणी, लग्न ठरल्यानंतर हॉल, जेवण, कपडे, थीम, अशा चर्चा घरात झडू लागतात. मुख्य म्हणजे लोकांच्या हातात पैसा असल्याने सगळ्या गोष्टी प्रोफेशनली करण्यावर आणि आऊटसोर्स करण्यावर भर दिसतो. यामुळेच वेडिंग इंडस्ट्रीमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत...**



लग्न म्हणजे कुणाच्याही आयुष्यात शक्यतो एकदाच होणारी महत्त्वपूर्ण घटना. आयुष्यभर लक्षात राहण्यासाठी या महत्त्वाच्या घटनेला आता मोठ्या इव्हेंटचं स्वरुप दिलं जाऊ लागलंय. काही दिवसांपूर्वी चट मंगनी पट ब्याह असं व्हायचं. एका दिवसातच लग्न आणि त्यातच रिसेप्शन वगैरेही उरकून टाकलं जायचं. पण आता हा ट्रेंड थोडा बदलतोय. तरुणाईच्या हातात पैसा खुळखुळू लागल्याने तसेच हौस म्हणूनही आता जरा वेगळ्या प्रकारे वेडिंग प्लॅनिंग करण्याकडे तरुणाईचा कल आहे. पूर्वी केवळ नॉर्थ इंडियन विवाह अनेक दिवस आणि भव्यदिव्य स्वरुपात साजरे होत असत. आता ३-४ दिवसांच्या लग्नांचा ट्रेंड आहे. त्यामुळे त्यासाठी सगळं काही प्लॅन करून देणारी मंडळी लागतात. वेडिंग इंडस्ट्री विस्तारली असून, विविध प्रोफेशनमधील व्यक्तींचा त्यात समावेश आहे. वेडिंग प्लॅनर, केटरर, फोटोग्राफर, व्हिडीओग्राफर, ड्रेस डिझायनर, कोरिओग्राफर, प्रिंटिंग व्यवसायातील लोक, मेकअप आर्टिस्ट, असे विविध व्यवसायातील लोक एकमेकांच्या सहकार्याने येथे काम करताना दिसतात. या व्यवसायांवर अनेक लहान- मोठे व्यवसायदेखील अवलंबून आहेत. लग्न जमवायचं म्हणजे मॅरेज ब्युरो आले. मॅरेज ब्युरोंनीदेखील काळानुसार कात टाकली आहे. ते प्रोफेशनल झाले असून, तरुण मुलं- मुलीदेखील या व्यवसायात दिसू लागलेत. इव्हेंट प्लॅनर हा एक मोठा व्यवसाय आहे. प्रत्येक लग्न वैशिष्ट्यपूर्ण आणि बजेटमध्ये बसणारे असेल याची काळजी इव्हेंट प्लॅनरना घ्यावी लागते. त्यांच्याकडे कल्पकता, सुसूत्रता आणि संवाद साधण्याची क्षमता असणे गरजेचे असते. संपूर्ण इव्हेंट डिझाइन करण्यापासून तो प्रत्यक्षात येईपर्यंत वेडिंग प्लॅनरची जबाबदारी मोठी असते. वेडिंगच्या थीमनुसार जेवण बनवण्याची जबाबदारी केटररकडे आणि वेशभूषेची जबाबदारी ड्रेस डिझायनरकडे असते. लग्नाच्या पत्रिकांमध्येही हल्ली वैविध्य आले आहे. मेंदी, संगीत या कार्यक्रमांसाठी त्या त्या क्षेत्रातील लोकांची गरज असतेच. संगीतसाठी हल्ली कोरीओग्राफर नेमले जातात. मेकअप आर्टिस्ट, फ्लॉवर डेकोरेटर, अशा विविध लोकांना यानिमित्त रोजगार मिळत आहे. या क्षेत्राची भरभराट होत असल्याने करिअरच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. आपले लग्न खास व्हावे, अशी प्रत्येक तरुणाची इच्छा असते. त्यासाठी पैसे खर्च करण्याचीही त्यांची तयारी असते. अशा तरुणांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, तसेच अन्य तरुणांना व्यवसायाच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी वेडिंग इंडस्ट्री सज्ज होतेय. ही संधी चुकवू नका...




# इव्हेंटफुल प्रतीक्षा!

सगळ्यांपेक्षा वेगळा विचार करायचा आणि तो प्रत्यक्षात आणायचा, ही ऊर्मी फार कमी लोकांमध्ये असते. पदवीचे शिक्षण घेणारी प्रतीक्षा भागवत अशाच कमी लोकांमधील एक. अजून पदवीही हातात पडलेली नसली, तरी वेगळ्या क्षेत्रात झेप घ्यायचा तिचा प्लॅन मात्र तयार आहे. इतकंच नाही, तर स्वत:ची कंपनी सुरू करून तिनं हा प्लॅन प्रत्यक्षातही आणला आहे. गेल्याच वर्षी तिनं स्वत:ची आर्क इव्हेंट्स अँड एन्टरटेन्मेंट नावाची इव्हेंट मॅनेजमेंट कंपनी सुरू केली आहे.

## सुरुवात कशी झाली?

इव्हेंट मॅनेजमेंट हे क्षेत्र करिअरसाठी अजून तसं नवखंच आहे. प्रतीक्षानं मात्र यात करिअर करायचं नक्की करून टाकलंय. बारावीनंतर काय करायचं, म्हणून तिनं इव्हेंट मॅनेजमेंटचा कोर्स केला. कोर्सदरम्यानच तिला या क्षेत्राचा अनुभव मिळाला . त्यानंतर ती आणि तिच्या काही मित्र- मैत्रिणींनी मिळून पॅनामेरा नावाची कंपनी सुरू केली. त्यानंतर संधी मिळताच गेल्या वर्षी तिनं अर्चना राणे यांच्याबरोबर राजा परांजपे प्रॉडक्शन्स या कंपनीमध्ये काम केलं. हे काम करताना आपली स्वत:ची कंपनी असावी, असं तिला प्रकर्षानं वाटू लागलं. त्यातूनच सुरू झाली, तिची आर्क इव्हेंट्स अँड एन्टरटेन्मेंट कंपनी. एखादी गोष्ट करायची ठरवली, की ती नक्की पूर्ण करायचीच, अशी जिद्द असल्यानं घरच्यांकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत न घेता आपलं भांडवल स्वत: जमा करत तिने पहिला इव्हेंट केला. यानंतर ती थांबलीच नाही. घरच्यांचा पूर्ण पाठिंबा आणि मित्रांची साथ यामुळे तिनं नाटक, शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल, काही प्रदर्शनं यासारख्या इव्हेंट्सचं व्यवस्थापन केलं.

## पुढं काय?

प्रतीक्षाला एक-एक पायरी ओलांडत पुढं जायचं आहे. काम करायची तयारी, जिद्द, चिकाटी, घरच्यांची आणि मित्र-मैत्रिणींची साथ यांच्या साह्यानं आर्कचं नाव मोठे करायचे आहे. इव्हेंट मॅनेजमेंटची काहीही पार्श्वभूमी नसलेल्यांनाही ती आपल्या कंपनीमध्ये घेणार आहे. इतक्या लहान वयात स्वत:ची कंपनी उभी करणं सोपं नाही. त्यासाठी हवी जिद्द आणि आत्मविश्वास. प्रतीक्षामध्ये दोन्ही आहे. तिच्या या गुणांमुळे आणि कधीही माघार न घेण्याच्या वृत्तीमुळे ती नक्कीच पुढे जाईल.

## *भावना, आपुलकीचा मसाला कामी येतो*

*मानसशास्त्र विषयात डिप्लोमा केल्यानंतर केटरिंग व्यवसायाची परंपरा असलेल्या घरातील मुलाशी माझं लग्न झालं. त्यानंतर माझ्या करिअरचा ट्रॅक बदलला. गेली सात वर्षे केटरिंग व्यवसायाची जबाबदारी अगदी चोख पार पाडणं हेच माझं ध्येय आहे. लग्न समारंभात केटरिंग हा महत्त्वाचा भाग असतो. लग्नातील केटरिंग व्यवसायातून परंपरा, संस्कृती जपणं महत्त्वाचं असतं. लग्नातील जेवण, केटरिंग आणि पाहुण्यांचं आदरातिथ्य यावरून स्टेटस मेन्टेन करण्याकडे लक्ष दिलं जातं. केटरर म्हणून या क्षेत्राकडे बघताना, लग्नातील जेवणाची चव पाहुण्यांच्या जीभेवर रेंगाळते, तेव्हा तीच कामाची पावती ठरते. केटरिंग व्यवसायाला आता एक विशेष दर्जा मिळाला आहे. लग्नात केटरिंगची ऑर्डर पार पाडताना खास अभिमान वाटतो. या क्षेत्रात आपलं वर्चस्व राखत लग्न समारंभ संस्मरणीय व्हावा, यासाठी व्यावसायिक राहण्यापेक्षा आपुलकी आणि पारंपरिकता जपणं खूप गरजेचं आहे. गेल्या सात वर्षांत अनेक हाय प्रोफाइल लग्नांची केटरिंग ऑर्डर पार पाडताना भावना, संस्कृती, परंपरा, आपुलकी या सर्व गोष्टींचा मसालाच कामी येतो. यामुळे सध्याच्या लग्नाच्या दिवसांत केटरिंग व्यवसायाकडे एक मोठ्ठं व्यासपीठ म्हणून मी बघते.*

***– क्षितिजा नातू,*** केटरर

## शॉर्ट न्यूज

### पोलिसांना मिळणार ३२० फ्लॅट

■ **नगर :** लालटाकी येथील पोलिस वसाहतीमध्ये पोलिसांना ३२० फ्लॅट मिळणार असून यासाठी ११५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आ. संग्राम जगताप यांनी दिली आहे. पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या शासकीय वसाहतीची दुरावस्था झाली होती. त्यामुळे याठिकाणी नवीन इमारत व निवासस्थानाच्या बांधकामासाठी मंजुरी मिळावी यासाठी प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले. आ. जगताप यांनी २०२३ साली तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा केला होता. आता आ. जगताप यांच्या या पाठपुराव्यास यश आले.

### जिलेटिनच्या स्फोटात दोघांचा मृत्यू

■ **कर्जत :** विहिरीत काम करीत असताना मजूर बाहेर यायच्या अगोदरच जिलेटिनच्या स्फोटाने दोघांचा मृत्यू तर एक मजूर जखमी झाला. ही घटना कर्जत शहरालगतच्या मेहेत्रे मळा येथे घडली. विठ्ठल लक्ष्मण जाधव (वय २७, रा. करमाळा, जि. सोलापूर), संतोष कुमार (रा. उत्तर प्रदेश, पूर्ण नाव नाही) अशी मृतांची नावे आहेत. मिनीनाथ उद्धव चोपडे (रा. वीट, ता. करमाळा) यांच्या फिर्यादीवरून गणेश मेहेत्रे, ट्रॅक्टर चालक (नाव माहीत नाही) आणि मॅक्झिन मालक दत्तात्रय विक्रम जायभाय (रा. दूरगाव, ता. कर्जत) यांच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### ग्राममंदिरे ग्रामस्थांच्या ताब्यात द्या

■ **शिर्डी :** शहरातील ग्रामदैवत असणारे मंदिरे ग्रामस्थांकडे साई संस्थानने वर्ग करावेत. अशी मागणी शिर्डी ग्रामस्थांनी ग्रामसभेत केली आहे. शिर्डी येथे ग्रामसभा राहता कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गंगाधर गोंदकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती. यावेळी या ग्रामसभेत माजी नगराध्यक्ष कैलास कोते यांनी तसा ठराव मांडला होता व त्यास माजी नगराध्यक्ष शिवाजी अमृतराव गोंदकर यांनी अनुमोदन दिले होते. यावेळी ग्रामसभेत सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला.

### जलजीवन योजनेच्या कामाचा स्पीड ब्रेकर

■ **नेवासा :** तालुक्यातील मुकिंदपूर आणि इतर सात गावांसाठी नियोजित प्रादेशिक पाणीपुरवठा योजना रखडल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. ही योजना एप्रिल २०२४ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा होती. मात्र, अनेक अडथळ्यांमुळे या योजनेच्या कामाला अजूनही एक वर्ष लागण्याची शक्यता आहे. परिणामी, गावकऱ्यांना २०२५ च्या उन्हाळ्याऐवजी २०२६ च्या उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचा लाभ मिळेल. मात्र, नियोजित वेळेत काम न झाल्याने ठेकेदाराला दंड होणार असल्याचे बोलले जात असले तरी अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.

### आदिवासी आश्रमशाळेची आ. खताळांकडून पाहणी

■ **संगमनेर :** आमदार अमोल खताळ पाटील यांनी साकूर येथे आदिवासी आश्रम शाळेला अचानक भेट देऊन पाहणी केली असता, अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. शासनाकडून आदिवासी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा लाभ त्यांच्यापर्यंत व्यवस्थितपणे पोहचवला जात नसल्याचे जाणवले. या शाळेत शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष केलं जात आहे. शाळेवर मुख्याध्यापक कदम हजर नव्हते. ते राजूर प्रकल्प कार्यालय येथे बैठकीसाठी गेल्याची माहिती कर्मचाऱ्यांनी दिली.

# सोशल मीडियाचा अनावश्यक वापर टाळणे काळाची गरज

## आमदार संग्राम जगताप यांचे मत




**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**शिवजयंतीनिमित्त राधाकृष्ण फाऊंडेशनतर्फे सोशल मीडियाबाबत मार्गदर्शन सोशल मीडियावर प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी सुरू असलेली स्पर्धा जीवघेणी ठरत असून, सायबर फसवणुकीला निमंत्रण देणारी आहे. त्यामुळे सोशल मीडियाचा अनावश्यक वापर टाळणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त राधाकृष्ण फाऊंडेशनच्या वतीने "सोशल मीडियाचा मिसयूज होऊ नये, यासाठी माझा प्रश्न सायबर क्राईमला' या विषयावर सायबर क्राईम मार्गदर्शन व प्रश्नोत्तरे संवाद कार्यक्रमात आ. जगताप बोलत होते. ते म्हणाले की, सोशल मीडियामुळे वेगवेगळ्या प्रकारे सायबर फसवणुकीचे वाढते प्रकार पाहता सर्वांनीच सतर्क होणे आवश्यक आहे. सोशल मीडियावरील फसव्या जाहिराती, तसेच आमिषांना बळी न पडता विचारपूर्वक कृती केल्यास आपली फसवणूक टळू शकते. नगर शहर व जिल्हा सायबर क्राईममुक्त करणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे. त्या दृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेदेखील यावेळी आमदार जगताप म्हणाले.

सोशल मीडियावरील आमिषांना राजकीय, सामाजिक, वैद्यकीय, अभियांत्रिकी, क्षेत्रातील उच्चशिक्षित लोक बळी पडत आहेत, ही बाब गंभीर आहे.

राधाकृष्ण फाउंडेशनच्या अध्यक्ष आयोजक सुमित कुलकर्णी म्हणाले की, सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी शासनाने एक विशेष व वेगळी शाखा सुरू केलेली आहे, हे बऱ्याच लोकांना माहीत नाही. सायबर क्राईम ब्रँच कार्यपद्धतीविषयी समाजात माहिती व जनजागृती व्हावी, या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आ. जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आज हा सायबर क्राईम जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सायबर क्राईम व सुरक्षिततेविषयी समाजात व्यापक प्रसिद्धी होईल. भविष्यातही मोठ्या प्रमाणात अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे या वेळी सुमित कुलकर्णी म्हणाले.

सायबर पोलीस स्टेशनचे राहुल गुंडू यांनी उपस्थितांना सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन केले. कोणत्याही संस्थेकडून बोलत असल्याची बतावणी करणाऱ्यांना आपल्या बँकेची, एटीएमची, क्रेडिट कार्डची माहिती किंवा ओटीपी देऊ नये. तसेच त्यांच्या सांगण्यावरून कोणतेही ॲप डाऊनलोड करू नये. अनोळखी व्यक्तींच्या सांगण्यावरून किंवा क्यूआर कोड स्कॅन करू नये. सोशल मीडिया साईटवरून अनोळखी व्यक्तींशी व्यवहार करू नये, आदी सूचना गुंडू यांनी केल्या. सूत्रसंचालन गौरी जोशी यांनी केले.

# ठाकरे पुन्हा एकत्र येणार का?

## ■ लग्नसमारंभात हास्य विनोद रंगल्याने पुन्हा चर्चा
## ■ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे लक्ष्य

**मुंबई : प्रतिनिधी**

**राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोघे एकत्र येणार का? याच्या चर्चा महाराष्ट्रात गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहेत. त्यातच विधानसभा निवडणुकीत दोन्ही नेत्यांच्या पक्षांना अपयश मिळाले आहे. त्यामुळे पराभवाच्या छायेत असलेल्या या दोन्ही भावांनी आता एकत्र यावे, अशी चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. त्यातच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता जवळ आल्या आहेत. त्यामुळे या दोन्ही नेत्यांबाबत अनेक तर्क-वितर्क लावले जात आहेत. या दरम्यान मुंबईमध्ये एका कार्यक्रमादरम्यान हे दोन्ही भाऊ एकमेकांसोबत हास्य विनोद करताना दिसून आले. त्यामुळे ठाकरे पुन्हा एकत्र येणार का? अशी चर्चा पुन्हा एकदा रंगली आहे.**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे प्रमुख राज ठाकरे हे मुंबईतील एका विवाह समारंभात एकत्र आले होते. मुंबईतील एका प्रशासकीय अधिकाराच्या मुलाचा विवाह सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी उद्धव ठाकरे यांच्यासोबत रश्मी ठाकरे देखील उपस्थित होत्या. यावेळी उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि रश्मी ठाकरे यांच्यात चांगलाच संवाद रंगला होता. राज आणि उद्धव यांच्यात



चर्चा सुरू असतानाच काहीतरी विनोद झाला असावा आणि रश्मी ठाकरे हसतानाचा एक फोटो सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

**विधानसभा निवडणुकीत दोन्ही नेत्यांचा पक्षाचा पराभव**

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या दोघांचे पक्ष एकमेकांसोबत यावे यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. अनेकांनी तसे वक्तव्य देखील केले होते. मात्र दोन्ही नेत्यांकडून एकमेकांवर कायम आरोप प्रत्यारोप करण्यात आले. त्यामुळे हे दोन्ही पक्ष एकत्र येतील, अशी शक्यता नव्हती. मात्र आता विधानसभा निवडणुकीत दोन्ही नेत्यांचा पक्षाचा दारुण पराभव झाला आहे. त्यामुळे आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे दोन्ही नेते एकत्र येतील का? याबाबत तर्कवितर्क लावले जात आहे.

**दोन्ही नेत्यांमधील राजकारणातील वितुष्ट वाढले**

आदित्य ठाकरे पहिल्यांदा विधानसभा निवडणुकीला उभे राहिल्यानंतर राज ठाकरे यांनी त्यांच्या विरोधात उमेदवार न देता अप्रत्यक्षपणे त्यांना पाठिंबा दिला होता. मात्र मागील निवडणुकीत राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे दादर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीला सामोरे जात असताना उद्धव ठाकरे यांनी त्या मतदारसंघांमध्ये उमेदवार दिला. इतकेच नाही तर उद्धव ठाकरे यांचा उमेदवार या निवडणुकीत विजयी देखील झाला आहे. त्यामुळे अमित ठाकरे यांचा पहिल्याच निवडणुकीत पराभव झाला. त्यामुळे या दोन्ही नेत्यांमधील राजकारणातील वितुष्ट पुन्हा एकदा वाढले असल्याची चर्चा सुरू आहे.

# मढीच्या यात्रेत मुस्लिम व्यापाऱ्यांना बंदी

## ग्रामसभेचा ठराव । येथे येणारे व्यापारी परंपरा पाळत नाहीत

**पाथर्डी : प्रतिनिधी**

**पुढील महिन्यापासून सुरू होणाऱ्या मढी येथील चैतन्य कानिफनाथ महाराजांच्या यात्रेमध्ये यंदा मुस्लिम समाजाच्या व्यावसायिकांना बंदी घालावी, असा ठराव ग्रामसभेने संमत केला. यात्रेला शेकडो वर्षांची परंपरा असून हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक म्हणून यापूर्वी यात्रेकडे बघितले जात होते. पण या ठरावामुळे यात्रा वादात सापडण्याची चिन्हे आहेत.**



राज्यातील भटक्या समाजाची पंढरी म्हणून मढीच्या यात्रा प्रसिद्ध आहे. राज्यातील अठरापगड जातींच्या भाविकांचे कुलदैवत म्हणून कानिफनाथांकडे पाहिले जाते. शनिवारी सरपंच तथा देवस्थान समितीचे अध्यक्ष संजय मरकड यांनी त्यांच्याकडे विविध गावांच्या भाविकांच्या आलेल्या पत्राची दखल घेत ग्रामसभेपुढे विषय मांडला.

यावेळी बोलताना ते म्हणाले, एक महिन्यावर यात्रा आली असून पारंपारिक पद्धतीनुसार या काळात महिनाभर कौटुंबिक सर्व कामे बंद ठेवून सर्व ग्रामस्थ नाथांच्या सेवेमध्ये झोकून देतात. येथे येणारे व्यापारी परंपरा पाळत नाहीत. त्यामुळे हिंदूंच्या भावनांना ठेच बसल्यासारखे वातावरण झाले आहे.कुंभमेळ्याच्या धर्तीवर मुस्लिम व्यापाऱ्यांना बंदी केली, तशी ग्रामसभेच्या ठरवा मध्ये मुस्लिम व्यापाऱ्यांना यात्रेत बंदी केली आहे. जो माणूस कुंकू लावत नाही, त्याने आम्हाला कुंकू विकावे एवढी दुर्भाग्याची गोष्ट हिंदू धर्मासाठी म्हणावी लागेल, असेही ते म्हणाले.

## वाचकांच्या लेखणीतून

# तालीम

गेल्या २३ फेब्रुवारी रविवार रोजीच्या मुंबईच्या नवशक्ति दैनिकात ग्रामीण भागातील तालमी कालबाह्य अशी निराश सूर असलेली बातमी वाचली.

तालीम हा मूलत: अरबी शब्द आहे. त्याचा अर्थ अधिकारिक निर्देश किंवा शिक्षण. हा शब्द काश्मिरी, उर्दू, हिंदी आणि मराठी भाषेतही शिक्षण या अर्थाने वापरला जातो. १९ व्या शतकातील हिंदुस्थानातील थोर मुस्लिम समाजसुधारक सर सैयद अहमद खान म्हणत, तालीम ही इंसान की रूह को ख़ूबसूरत बनाती है (शिक्षण हेच माणसाच्या आत्म्याला सुंदर बनविते). महात्मा गांधीजी वा आचार्य विनोबांची नयी तालीम ही संकल्पना येथे आठविल्याविना राहणार नाही. मराठीत कुस्ती शिकण्याचा सराव करण्याचे ठिकाण अशाही अर्थी हा शब्द वापरला जातो. माझ्या बालपणी अशी तालीम मी गावी पाहिलेली आहे. किंबहुना गावोगावच्या जत्राखेत्रांमधल्या कुस्तीच्या आखाड्यांतील पहिलवान आणि त्यांच्या कुस्त्या आम्ही लहान मुले पाहत असू. त्याने प्रेरित होऊन कधी कधी आम्हा लहान मुलांचा चमूही कुस्तीचा सराव करण्यासाठी आमच्या निघोज गावच्या मोरोबाच्या देवळातील तालमीत उतरत असू. हा आमचा संकल्प अल्पावधीतच मावळला! वय कमी; पण झेप मोठी अथवा होश कम; जोश ज्यादा असा तो प्रकार होता. असो. तो संकल्प जहां से लगी बाजी वहीं पे हारा!



केबल नेटवर्क, इंटरनेट तथा प्रसार माध्यमांच्या नाविन्यापोटी ग्रामीण भागातील तालमी ओस पडत आहेत वा बंद पडत आहेत. हेल्थ लाईन, बॉडी सेंटर आदींमध्ये असणाऱ्या नवीन यंत्रसामुग्री व उपकरणांच्या आकर्षणाखातर तरुण वर्गाने पारंपरिक तालमींकडे पाठ फिरविली आहे. आता पारंपरिक तालमी बंद झाल्याने चेलेच उरले नाहीत. उस्तादांचा तर विषयच नको! नव्या युगातले चेले आणि उस्तादही वेगवेगळ्या महागड्या पावडरी खाऊन आपले भरीव नव्हे; तर फुगारा आलेले दंडदर्शन घडवीत आहेत. ते बघून त्यांची दया तर येतेच; पण मनातल्या मनात हसूही येते!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावा

**नेवासा : प्रतिनिधी**



**ॲग्रीस्टक (फार्मर आयडी) मधून कृषी व महसूल विभागाच्या योजना सर्व शेतकऱ्यांना पारदर्शिपणे व कुठल्याही अडचणी शिवाय दिल्या जाणार असल्याने सर्वांनी फार्मर आयडी काढून घ्यावा, असे आवाहन तहसीलदार डॉ. संजय बिरादर यांनी केले.**

नेवासे महसूल मंडळ कार्यालयात शेतकरी ओळखपत्राचे वाटप तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांच्या हस्ते करण्यात आले. विशिष्ट सांकेतांक क्रमांक प्रत्येक शेतकऱ्याला मिळावे वा त्या माध्यमातून केंद्राच्या व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा, याकरिता महसूल विभाग नेवासे खुर्द मंडळ यांनी सदर शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी मंडलाधिकारी अनिल गव्हाणे यांनी प्रास्ताविक करत शेतकरी ओळख पत्राचे फायदे व गरज याबाबत मार्गदर्शन केले.

ग्राम महसूल अधिकारी धनंजय परदेशी यांनी शिबिरार्थीचे स्वागत केले. ॲग्रीस्टॅकमधून शेतकऱ्यांची विशिष्ट ओळख तयार केली जाते. त्यामुळे कृषी व महसूल विभागाच्या योजना सर्व शेतकऱ्यांना पारदर्शिपणे व कुठल्याही अडचणीविणा दिल्या जाणार आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी आधारकार्ड वरून आपला फॉर्मर आयडी काढून घ्यावा, असे आवाहन तहसीलदार डॉ. बिरादार यांनी केले.

मंडळ अधिकारी अनिल गव्हाणे व त्यांचे सहकारी ग्राम महसूल अधिकारी धनंजय परदेशी, कृणाल गोंधळी, अजित कोकणे, रुचिता कडाळी, पल्लवी पवार यांनी शिबिराचे आयोजन केले होते. यासाठी कृषी मंडळ अधिकारी आर. एस. ढोकणे, कृषी सहायक नवनाथ भोसकर यांचे साहाय्य लाभले. नेवासे खुर्द सोसायटी अध्यक्ष मच्छिंद्र कडू हे उपस्थित होते.

(पान १ वरून)

### केंद्र व राज्यातील सरकारमुळे निधी कमी पडणार नाही

पातळीवरील उंच उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल आ. दाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशांत गायकवाड, विक्रमसिंह कळमकर, सुषमा रावडे, वसंत चेडे, अश्विनी थोरात, सोनाली सालके, अतुल माने, किसनराव शिंदे, भास्करराव उचाळे, सुभाष दुधाडे, मा. सरपंच भाऊसाहेब डेरे, रखमाजी कापसे, अपर्णा खामकर आदी मान्यवर उपस्थित होते. राजेंद्र डेरे यांनी सुत्रसंचलन तर बाबासाहेब येवले यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विश्वनाथ येवले, हनुमंत डेरे, राजेंद्र डेरे, गणेश डेरे, ज्ञानदेव डेरे, शरद येवले, राहूल येवले, राजाराम येवले, बाळासाहेब येवले, भाऊसाहेब येवले, कैलास येवले, संदीप भोर, पवन भोर, संदीप गोसावी, पोपट दाते यांनी परिश्रम घेतले.

### ...तर राज-उद्धव भेटीचे स्वागत !

येऊच नये. किंवा तशा प्रकारचे त्यांचे नेहमी वक्तव्य असते. अशावेळी साहित्यिक यांनी देखील पार्टी लाईन वरच्या कमेंट करणे योग्य नाही. त्यांनीही मर्यादा पाळायला पाहिजे, असे माझे मत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. नीलम गोऱ्हे या उद्धव ठाकरे यांच्या पक्षात होत्या. मी त्या पक्षात नव्हतो. त्यामुळे त्या पक्षात काय चालायचे हे त्याच सांगू शकतात. मी त्यावर कमेंट करू शकत नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.मंत्र्यांचे पीएसडी नेमण्याचा अधिकार हा मुख्यमंत्र्यांनाच असतो मंत्र्यांचे पीएसडी नेमण्याचा अधिकार हा मुख्यमंत्र्यांनाच असतो, हे माणिकराव कोकाटे यांना माहिती नसेल. मंत्री केवळ नावांची शिफारस करत असतात. तो प्रस्ताव आल्यानंतर मुख्यमंत्री त्यावर अंतिम निर्णय करतात. हे काही नव्याने होत नाही. यासंबंधी मंत्रिमंडळ बैठकीत देखील मी सांगितले आहे. मंत्र्यांनी हवे ती नावे पाठवावी. मात्र त्या नावांमध्ये ज्यांची नावे फिक्सर म्हणून किंवा चुकीच्या कामांमध्ये आहेत. त्यांना मान्यता देणार नाही, असे मी सांगितले आहे. आतापर्यंत १२५ च्या जवळपास नावे माझ्याकडे आली आहेत. त्यातील १०९ नावे क्लियर केलेली आहेत. उर्वरित नावे क्लियर केलेली नाही. कारण त्यांच्यावर कुठला तरी आरोप आहे किंवा त्यांची चौकशी सुरू आहे. त्यामुळे कोणीही नाराज झाले तरी अशा प्रकारच्या नावांना मान्यता देणार नसल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केला आहे.

### अपघातानंतर मोटर पेटून दोघांचा जळून मृत्यू

पध्दतीमुळे मोटारीचे दरवाजे लॉक झाल्याचा अंदाज व्यक्त केला जातआहे. त्यामुळे मोटारीतील दोघांना बाहेर पडता आले नाही. त्यातच दोघांचा मोटारीतच जळुन दुर्दैवी मुत्यू झाल्याचा अंदाज वर्तवला जातो. घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी हे त्या ठिकाणी आले. यानंतर जामखेडचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनीही आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. जामखेड नगर परिषदेच्या अग्निशमन दलाने आग विझवली. अग्नीशमन दलाचे आय्यास शेख, विजय पवार, अहमद शेख या जवानांनी त्यासाठी प्रयत्न केले. मोटार पूर्ण जळुन खाक झाली. दोघांचाही जागीच मृत्यू झाला होता.घटनास्थळी कर्जतचे उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे यांनी भेट देऊन पाहणी केली.

# योगेश रोकडे यांचा निक्षय मित्र म्हणून सन्मान

## ■ क्षय रूग्णांसाठी रोकडे यांचे योगदान ■ केंद्र सरकारकडून दखल

**सुपा : प्रतिनिधी**

**क्षयरोगमुक्त अभियानांतर्गत उद्दीष्टपुर्तीसाठी सामाजिक दायित्व म्हणून निक्षय मित्र संकल्पनेच्या अहवानास प्रतिसाद देत योगदान दिल्याबददल सुपे येथील उद्योजक योगेश रोकडे यांचा आरोग्य व कुटूंबकल्याण मंत्रालयाच्या वतीने निक्षय मित्र म्हणून सन्मान करण्यात आला.**

आरोग्य व कुटूंब कल्यच मंत्रालयाच्या वतीने दि.२४ मार्च २०२३ रोजी क्षयरोग मुक्त अभियान सुरू करण्यात आले. त्याअनुषंगाने निक्षय मित्र संकल्पना पुढे आल्यानंतर त्यास उद्योजक रोकडे यांनी प्रतिसाद देत आपले योगदान दिला. सुपा येथील आयुष्यमान आरोग्य मंदिरात उपचार घेत असलेल्या क्षय रूग्णांना सन २०२३ पासून दत्तक घेऊन त्यांना रोकडे यांच्याकडून पोषण साहाय्य करण्यात येत आहे. त्यांच्या या सामाजिक दायित्वाची दखल घेउन शासकीय निक्षय पोर्टलवर त्यांची नोंदणी करण्यात आली आहे. जिल्हा क्षयरोग केंद्रामार्फत सर्व निक्षय मित्रांची माहीती पंतप्रधान कार्यालयासह राज्यपाल व मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठविण्यात आल्यानंतर या कार्यालयांमध्येही रोकडे यांच्या सामाजिक दायित्वाची नोंद झाली आहे.



■ क्षय रूग्णांसाठी सामाजिक दायित्व म्हणून दिलेल्या योगदानाबद्दल उद्योजक योगेश रोकडे यांचा निक्षय मित्र म्हणून सन्मान करण्यात आला.

### रोकडे यांचा संकल्प

क्षयरोग निर्मुलन ही लोकचळवळ व्हावी, प्रचार, पसार, जनजागृती व्हावी, लोकसहभाग वाढावा यासाठी सामाजिक स्तरावर टी बी मुक्त ग्रामपंचायत ही संकल्पना सुपा गावामध्ये राबविण्यात येणार आहे. सरपंच, उपसरपंच, सदस्य तसेच प्रतिष्ठीत नागरीकांना त्यात सहभागी करून घेण्यात येणार आहे. येत्या २४ मार्च रोजी उपचार घेणाऱ्या रूग्णांना पोषण आहार सहाय्य देण्याचा संकल्प उद्योजक योगेश रोकडे यांनी केला आहे.

### आरोग्य विभागाचे अभियान

जास्तीत जास्त क्षय रूग्ण शोधून काढणे व उपचारासाठी आणणे यासाठी राज्य शासनाच्या आरोग्य विभागाचे १०० दिवसीय अभियान ७ डिसेंबर ते २४ मार्च २०२५ दरम्यान राबविण्यात येत आहे. उपकेंद्र स्तरावर अतिजोखमीची व्यक्ती, मधुमेही, जुने क्षयरोग उपचारीत रूग्ण, क्षय रूग्णाचे सहवासीत,६० वर्षावरील नागरीक यांची मोफत तपासणी करून उपचारही मोफत करण्यात येणार आहेत.

# गोदावरी खोऱ्यात पाणी अडविण्यास परवानगी द्या

## भूमिपुत्र शेतकरी संघटनेची मागणी

**वारणवाडी : प्रतिनिधी**

**गोदावरी खोऱ्यात बंधारे बांधून पाणी आडविण्यास बंद असल्याने पावसाळयात पडणारे पाणी वाहून जाते. विशेषतः उन्हाळयात पाणी टंचाई निर्माण झाल्यानंतर शेतांमधील उभी पिके जळून जातात. त्यासाठी गोदावरी खोऱ्यात पाणी अडविण्यास परवानगी देण्याची मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे अध्यक्ष संतोष वाडेकर यांनी केली.**



पारनेर तालुक्यातील दुष्काळी गावांतील शेतीसाठी कुकडी प्रकल्पातून हक्काचे पाणी मिळावे या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने गाव तिथे कृती समिती अभियान सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून वारणवाडी येथे कृती समितीची स्थापना करण्यात आली. त्यावेळी संतोष वाडेकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना वाडेकर यांनी तांबडीकार प्रकल्प, वारणवाडी येथील चोंडी बंधारा बांधण्यासाठी परवानगी देण्याची आग्रही मागणी केली. यावेळी सरपंच संजय काशीद, भाऊसाहेब कोकाटे, अन्सार पटेल, महेंद्र काशीद, संजय भोर, विशाल कोकाटे, सचिन कोकाटे, संजय भोर, अशोक बेलकर, नानाभाऊ काशीद, पंडीत गायके, बाबासाहेब काशीद, अक्षय गुंड, संतोष पानमंद, विशाल थोरात, मंजाबापू वाडेकर, पांडूरंग बेलकर, राहूल काशीद, विष्णू काशीद, पांडूरंग पानमंद, सुशील थोरात, राजेंद्र कोकाटे, जयसिंग काशीद, जगदीश बेलकर, नवनाथ कराळे, अर्जुन कोकाटे, गणेश काशीद, विठ्ठल काशीद, पांडूरंग कोकाटे, अमोल पानमंद, विलास बेलकर, विश्वास थोरात, जनार्दन काशीद, सतीश काशीद, तुषार गुंड, बाळू काशीद, गणपत चौधरी, अशोक काशीद, प्रवीण रोकडे, हरी कोकाटे, सुरेश बेलकर, पंढारीनाथ कोकाटे, बाबाजी काशीद, विष्णू बेलकर, धोंडीबा काशीद, विष्णू कोकाटे, सुरेश काशीद, संतोष काशीद, नवनाथ पानमंद, राजेंद्र गुंड, बबन कोकाटे, पोपट काशीद, बाळासाहेब गायके, तुषार काशीद, बाबाजी कोकाटे, बबन थोरात, हनुमंत थोरात, लक्ष्मण चौधरी, विनोद काशीद आदी उपस्थित होते.

# जामगांवात १५० जोडप्यांकडून महाकुंभ जलपुजन

## अनुगामी लोकराज्य महाभियान संस्थेचे आयोजन



**जामगांव : प्रतिनिधी**

**प्रयागराज येथील कुंभमेळयात जाऊन आलेली कुटूंब तसेच उपस्थित जोडप्यांच्या हस्ते जामगांव येथे अनुगामी लोकराज्य महाभियान या संस्थेच्या माध्यमातून तसेच जामगांव येथील हनुमान चालीसा मित्र मंडळ यांच्या वतीने महाकुंभ दर्शन सोहळा व १५० जोडप्यांच्या हस्ते सार्वजनिक जलपुजन करण्यात आले.**

यावेळी पानोली येथील डॉ. रामचंद्र थोरात यांनी उपस्थितांना संबोधित केले. पारनेर भाग जनसेवक प्रसाद तोटे यांनी प्रास्ताविक तर दत्तात्रय शिंदे यांनी सुत्रसंचलन केले. अहिल्यानगर उपविभाग प्रमुख दिपक रोहोकले यांनी आभार माणले. जामगांव येथील हनुमान चालीसा मित्र मंडळ व दैठणे गुंजाळ येथील हिंदवी विचार धारा यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

# अश्विनी थोरात यांना मातृशोक; लक्ष्मीबाई पवार यांचे निधन

**वाघुंडे खुर्द : प्रतिनिधी**

**वाघुंडे खुर्द येथील सौ. लक्ष्मीबाई पवार यांचे मंगळवार दि.१८ फेब्रुवारी रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. अहिल्यानगर भाजपाच्या महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा सौ. अश्विनीताई थोरात यांच्या त्या मातोश्री होत.**



लक्ष्मीबाई यांचे पती सैन्यदलात देशाची सेवा करत असताना लक्ष्मीबाई यांनी संसाराचा गाडा हाकण्याची जबाबदारी समर्थपणे पेललली. ५ मुली व १ मुलगा यांना उच्चशिक्षीत केले. त्यांचा एक मुलगा सीआयएसएफमध्ये सेवेत आहे.

# प्रसादालयासाठी ५ हजार रूपयांची देणगी

## नाथाशेठ लंके यांच्या स्मरणार्थ लंके परिवाराचे योगदान

**निघोज : प्रतिनिधी**



**प्रगतीशील शेतकरी नाथाशेठ लंके यांच्या स्मरणार्थ लंके परिवाराच्या वतीने मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचलित प्रसादालयास पाच हजार रूपयांची देणगी देण्यात आली.**

लंके परिवारातील सदस्य व मुंबई येथील व्यवसायीक बाळासाहेब लंके व प्रकाशशेठ लंके यांनी ही देणगी देत आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. लंके बंधू हे मुंबईत व्यवसायात कार्यरत असताना निघोज व परिसरातील धार्मिक, सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच मोठया प्रमाणावर योगदान देत सामाजिक कामांना पाठबळ देतात.

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचलित प्रसादालयात दररोज शेकडो भाविक प्रसादाचा लाभ घेतात. केवळ वीस रूपयात जेवणाची व्यवस्था करण्यात आल्याने भाविकांची मोठी सोय झाली आहे. या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून गावकरी तसेच राज्यातील भाविक तसेच ग्रामस्थ मोठया प्रमाणावर देणग्या देतात. राज्यातून ऑनलाईन देणग्यांचे प्रमाणही वाढले आहे.

# केदारेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह

## महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**बाभुळवाडे : प्रतिनिधी**

**महाशिवरात्रीनिमित्त बाभुळवाडे येथील श्री. केदारेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून सात दिवस नामवंत किर्तनकारांची किर्तनसेवा पार पडणार आहे. सप्ताहाचे यंदाचे ५६ वे वर्ष आहे.**



संजय महाराज कावळे, केशव महाराज जगदाळे, विजय महाराज गवळी, महादेव महाराज मोरे, तुषार महाराज पाबळे, संगिताताई ऐनापुरे, केशव महाराज उखळीकर यांची किर्तने तर पांडूरंग महाराज पडवळ, धनंजय महाराज गोरडे, विलास महाराज बोरूडे, गुलाब महाराज शिर्के, डॉ. आर जी सय्यद, सुभाष महाराज जगदाळे यांची प्रवचने होणार आहेत. गुरूवार दि. २७ रोजी सकाळी ९ ते ११ दरम्यान शालिराम महाराज खंदारे यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

बुधवार दि.९ रोजी सकाळी ९ ते ३ दरम्यान शाहीर तानाजी माळवदकर व शाहीर साहेबराव पवार यांचा भेदीक गाण्यांचा कार्यक्रम होणार असून बुधवार दि.२६ रोजी सकाळी ११ वाजता भेदीक सम्राट ठकसेन शिंदे यांच्या गाण्यांचा कार्यक्रम होईल. गुरूवार दि.२७ रोजी रात्री ९ वाजता अजिंक्य झांबरे प्रस्तुत जल्लोष महाराष्ट्राचा या सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

अखंड हरिनाम सप्ताह, भेदीक गाण्यांचा कार्यक्रम, मनोरंजनाचा सांस्कृतीक कार्यक्रम, ऑक्रेस्ट्रा, बैलगाडा शर्यत तसेच क्रिकेट स्पर्धा अशा कार्यक्रमांची रेललेचल असून त्याचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन महाशिवरात्री उत्सव मंडळ, केदारेश्वर ट्रस्ट, मुंबईकर व पुणेकर मंडळ तसेच ग्रामस्थांनी केले आहे.

### यात्रोत्सवाची तयारी पुर्ण

डोंगरावर असलेले स्वयंभू केदारेश्वर मंदिर येथे महाशिवरात्री निमित्त आयोजित यात्रोत्सवात राज्याच्या विविध भागातील भक्त हजेरी लावतात. देवस्थान ट्रस्टच्या वतीने विविध सोयी सुविधांची तयारी करण्यात आली आहे. मंदिर परिसरातील निसर्ग सौंदर्य असून देवस्थानकडे जाण्यासाठी नुकताच रस्ताही तयार करण्यात आला आहे. महाशिवरात्रीच्या दिवशी पालखी काढण्यात येणार आहे. भाविकांचया सोईसाठी राज्य परिवहन महामंडळाने शिरूर व पारनेर आगारातून खास बस सेवा देण्याची मागणी करण्यात आली आहे.

# हिमोफिलियाच्या घटकाची कमतरता भरून निघेल

## डॉ. दत्तात्रय लोडे यांचा विश्वास




**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**परदेशात ज्याप्रमाणे संशोधनाच्या प्रमाणात वाढ होत आहे त्याचा प्रमाणे भारतताही संशोधन वाढत असून हिमोफिलिया रूग्णांसाठी असणारी घटकांची कमतरता भविष्यात भरून निघेल असा विश्वास जी एस गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय लोडे यांनी व्यक्त केला.**

जी एस गुणे आयुर्वेद महाविद्यालयात आयोजिक हिमोफिलिया कार्यक्रमात डॉ. लोडे हे बोलत होते. यावेळी आयुर्वेद रूग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. समीर होळकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली कुलकण, फिजिओथेरपीस्ट डॉ. अमृता गवळी, नगरसेवक रविंद्र बारस्कर, हिमोफिलिया सोसायटी अहमदनगर चॅप्टरचे अध्यक्ष दादा भालेकर, इंटास फाउंडशेनचे सुरज माळी, डॉ. ज्ञानदेव आव्हाड, अरूण पानसंबळ आदी यावेळी उपस्थित होते.

डॉ. लोडे म्हणाले, आज हिमोफिलियामध्ये परदेशात नव-नवीन तंत्रज्ञान विकसीत झाले असून त्यावर योग्य अशी चाचणी सुरू आहे. भविष्यकाळात त्याचा देशातील रूग्णांना नक्की फायदा होईल. हिमोफिलिया रूग्णांच्या शरिरात ज्या घटकाची कमतरता होते ती नक्कीच भरून निघेल व हिमोफिलिया रूग्णांना सर्वसामान्यांप्रमाणे जीवन जगता येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी डॉ. रूपाली कुलकर्णी, रवींद्र बारस्कर यांनी रूग्णांना मार्गदर्शन केले, तर फिजिओथेरपीस्ट डॉ. अमृता गवळी यांनी व्यायामाचे महत्व विषद केले. यावेळी रूग्णांना इंटास फाउंडेशनच्या वतीने फिजिओथेरपी कीट व इंरजन्सीसाठी फॅक्टर वितरीत करण्यात आले. दादा भालेकर यांनी सुत्रसंचलन तर सुरज गवळी यांनी आभार मानले.

### फिजिओथेरपीसाठी रूग्णालय कटीबध्द

हिमोफिलिया रूणांची वाढती संख्या पाहता आयुर्वेदात काही करता येईल का ? यासाठी जी एस गुणे आयुर्वेद रूग्णालय सदैव कटीबध्द राहून भविष्यकाळात हिमोफिलियासाठी स्वतंत्र सेंटर सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. ताण, तणाव मुक्त होऊन वेदनामुक्त जीवनासाठी आयुर्वेदाच्या माध्यमातून काही करता येईल का यासाठी संशोधन सुरू असून हिमोफिलियासाठी फिजिओथेरपी देण्यासाठी आयुर्वेद रूग्णालय कटीबद्ध आहे.

**डॉ. समीर होळकर,** निवासी वैद्यकिय अधिकारी

# प्रतिभा गोरडे यांना गुणवंत कर्मचारी पुरस्कार

## नगरविकास विभागात उत्कृष्ट कामगिरी

**म्हस्केवाडी : प्रतिनिधी**

**मंत्रालयातील नगरविकास विभागातील कक्ष अधिकारी प्रतिभा नारायण गोरडे यांना राज्य सरकारच्या वतीने स्वराज्य अभियंता हिरोजी इंदलकर गुणवंत अधिकारी पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजितदादा पवार यांच्या हस्ते गोरडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

प्रतिभा गोरडे या पारनेर तालुक्यातील म्हस्केवाडी येथील रहिवासी आहेत. एम एस्सी संगणकशास्त्र या अभ्यासक्रमातून शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधून सन २०१८ मध्ये त्यांची विक्रीकर निरीक्षक तसेच राज्य उत्पादन शुक्ल निरीक्षक म्हणून निवड झाली होती. मात्र त्यावर समाधान न मानता गोरडे यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी सुरूच ठेवली. त्यानंतर त्यांनी मंत्रालय कक्ष अधिकारी म्हणून राज्य लोकसेवा आयोगाकडून निवड झाली.



### खो-खो संघाचे नेतृत्व

सन २०२३-२४ मध्ये नवी दिल्ली येथे पार पडलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राचा संघ प्रथमच सहभागी झाला होता. या संघाचे व्यवस्थापक म्हणून नेतृत्व करण्याची संधी गोरडे यांना मिळाली होती. महिलांच्या या संघाने पाहिल्याच प्रयत्नात ब्रांझपदक पटकाविले. दरम्यान, प्रतिभा गोरडे यांच्या या सन्मानाबददल पारनेर तालुक्यासह मंत्रालयात त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

### गोरडे यांची कारकिर्द

गोरडे या नगर विकास विभागात २८ जानेवारी २०१९ पासून कार्यरत आहेत. या विभागात नगर विकास विभागाच्या अस्थापनेच्या अनुषंगाने त्यांनी विविध कार्ये पार पाडली आहे. महिलांच्या कामाच्या ठिकाणी लैगिक छळास प्रतिबंध समितीच्या सदस्य सचिव म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. सध्या गोरडे या पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजासंबंधीच्या कार्यासानात कार्यरत आहेत.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com